I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 214-217
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# आदिवासी कवर समाजातील मौखिक लोकसाहित्य व लोकसंस्कृती

**सोहम एम. व पद्मरेखा धनकर**
सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर
*Corresponding Author :- spsatishpise@gmail.com

Communicated : 30.01.2023 | Revision : 07.03.2023 Accepted : 05.04.2023 | Published : 30.05.2023

**सारांश :**
नागरी संस्कृतीपासून दूर व अलिप्त राहिलेले संबंधित प्रदेशातील मुळचे रहिवासी म्हणजे आदिवासी समाज होय. आदिवासी जीवन म्हणजे मानवी जीवनाच्या आरंभावस्थेची सुरवात आहे. मानवी जीवनाच्या विकासात्मक अवस्थांचा अभ्यास करण्याआधी आदिवासी जीवनाचा, संस्कृतीचा व त्यांनी लिहिलेल्या साहित्याचा शोध घेणे महत्वाचे ठरते. आदिवासी जमातीचे लोकसाहित्य व लोकसंस्कृतीचे एक वेगळी वैशिष्टये दिसुन येतात. सध्याच्या युगात कवर जमातीविषयी व त्यांच्या लोकसाहित्या विषयी परिचय झालेला नाही मौखिक लोकसाहित्य हे खरच त्या संस्कृतीचे व जमातीचे इतर साहित्यापैकी एक आगळी वेगळी दर्शन व प्रत्यय आणुन देणारी ही आदिवासी कवर समाज आहे. कवर समाजातील लोकसाहित्याची तसेच लोकसंस्कृती हि त्या मानवी जीवनातील जीवन जगण्याचे एक आधार स्तंभ म्हणजे त्यांचे मौखिक लोकसाहित्य होय म्हणुन कवर समाजाच्या मौखिक लोकसाहित्याचा व संकृतीचा अभ्यास होणे गरजेचे आहे

**मुख्यशब्द** : आदिवासी, संस्कृती, लोकसाहित्य लोकसंस्कृती .

**प्रस्तांवना :**

नागरी संस्कृतीपासून दूर व अलिप्त राहिलेले संबंधित प्रदेशातील मुळचे रहिवासी म्हणजे आदिवासी समाज होय. आदिवासी जीवन म्हणजे मानवी जीवनाच्या आरंभावस्थेची सुरवात आहे. मानवी जीवनाच्या विकासात्मक अवस्थांचा अभ्यास करण्याआधी आदिवासी जीवनाचा, संस्कृतीचा व त्यांनी लिहिलेल्या साहित्याचा शोध घेणे महत्वाचे ठरते. आधुनिक काळात स्वातंत्र्योत्तर कालखंडात मराठी साहित्यात अनेक साहित्यप्रवाह व साहित्यप्रकार उदयास आले. कथा, कादंबरी नाटक, कविता, निबंध, आत्मचरित्रे, प्रवासवर्णने, ललित असे अनेक लोक वाड:मय प्रकार उदयास आले. आदिवासी समाजामध्ये अनेक वाड:मय सध्या वर्तमानात उदय झालेले दिसुन येते. त्यापैकी आदिवासी जमातीचे लोकसाहित्य व लोकसंस्कृतीचे एक वेगळी वैशिष्टये दिसुन येतात. सध्याच्या युगात कवर जमातीविषयी व त्यांच्या लोकसाहित्या विषयी परिचय झालेला नाही मौखिक लोकसाहित्य हे खरच त्या संस्कृतीचे व जमातीचे इतर साहित्यापैकी एक आगळी वेगळी दर्शन व प्रत्यय आणुन देणारी ही आदिवासी कवर समाज आहे. त्यामुळे कवर समाजातील लोकसाहित्याची तसेच लोकसंस्कृती हि त्या मानवी जीवनातील जीवन जगण्याचे एक आधार स्तंभ म्हणजे त्यांचे मौखिक लोकसाहित्य होय म्हणुन कवर समाजाच्या मौखिक लोकसाहित्याचा व संकृतीचा अभ्यास होणे गरजेचे आहे असे मला वाटते.

**कवर आदिवासी जमातीचे वैशिष्टये :–**

महाराष्ट्रातील आदिवासी जमातीपैकी कवर ही एक आदिवासी जमात आहे या जमातीचे वास्तव्य प्रामुख्याने गडचिरोली, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, नागपूर व अमरावती येथे मध्यप्रदेश व छत्तीसगडच्या सिमावर्ती भागात आढळून येते. कवर जमातीची वस्तीस्थाने आकाराने लहान–लहान तुटक वस्तीमध्ये विभागलेले असतात त्यामुळे त्यांना 'टोला' असेही म्हणतात. स्वभावाने अत्यंत लाजाळू, मेहनती व सुस्वभावी असतात. अंगमेहनत करून स्वत:चे अस्तित्व जपण्याचा प्रयत्न करीत असतात. व्यवहारात अत्यंत इमानदार व स्पष्ट व्यवहार म्हणुन समाजात

प्रसिध्द आहेत. साक्षरतेचे प्रमाण कमी असल्यामुळे इतर पाश्चात्य व प्रगत लोकांशी फार कमी संपर्क असल्याने तंत्रज्ञानाचा अभाव त्यांच्यात दिसुन येतो.

**कष्टाळू व स्वाभिमानीवृत्ती :–**

कवर जमात आर्थिक दृष्टया कमकुवत असला तरी त्यांच्यात लाचारीपणा किंवा भीक्षावृत्ती ही पध्दत अजीबात नाही. गरीबी, बेकारी अशिक्षितपणा आहे म्हणुन घरातच बसण्यापेक्षा अवघड काम करण्याची प्रचंड जिज्ञासा दिसुन येते. घरी खायला अन्न जरी नसेल तरीही त्यांचात काम करण्याची प्रंचड दुर्दम्य आशावाद दिसुन येते. त्यात स्त्रिवर्ग असो वा पुरूष दोघांमध्येही परिश्रम करून पोट भरण्याची आत्मशक्ती दिसुन येते. एकंदरीत ही जमात आपला स्वाभिमान जपण्याचा प्रयत्न करीत असतो. म्हणुन कवर आदिवासी या जमातीची एक प्रमाणीक समाज म्हणुन ख्याती आहे. प्रामाणिकपणाचे उत्तम उदाहरण म्हणजे कवर जमातीचे लोक एक उत्तम नमुना म्हणुन समाजात आजपर्यंत टिकुन आहेत त्यामुळे वर्तमानकाळातही आजही शहरात जेवढे अवघड काम करणारे आहेत ते कवर जमातीतीलच छत्तीसगडी भाषा बहुसंख्येने दृष्टीस पडतात त्यामुळे त्यांची कामाप्रती जिद्द व कष्टाळु वृत्ती दिसुन येते.

**कवर आदिवासी जमातीचे वर्णन :–**

एखाद्या वंशाची पाहाणी करावयाची तर त्या वंशातील काही विशिष्ठ शारीरीक गुणधर्म लक्षात घेतले पाहीजे. डोक्याचा आकार, केस, डोळे त्यांचा रंग, शरीराच्या कातडीचा रंग व शरीराचा बांधा हा विशीष्ठ भुप्रदेश च तेथील हवामान यांच्यावर अवलंबुन असतात परंतु कोणत्याही प्रदेशात व हवामानात राहात असले तरी ते कोणत्या वंशाचे आहे. हे शोधुन काढण्यासाठी त्याचा डोक्याचा आकार म्हणजेच डोक्याची लांबी रूंदी आणि उंची याचे सर्वसाधारण प्रमाण एखादया समाजातील लोकांचा वंश ठरविण्यास मदत होते असे म्हटले आहे.

अहमद (१९६३) यांच्या मते ,''कवर आदिवासी जमातीच्या डोक्याचा आकार लांब आणि अरूंद पसरट चेहरा अशी प्रतीकृती जास्त दिसतात. त्याचा वर्ण फिकट तांबडा त्यांच्या चेह–यावर आणि शरीरावर बुटके केस Scaty hair असतात.

**बोलीभाषा :–**

आपल्या देशामध्ये १६५३ मातृभाषा असल्याची नोंद जनगणनेच्या अहवालामध्ये करण्यात आली आहे. भारतातील आदिवासी जमातीच्या बोलीभाषेचा विचार केल्या सद्या आदिवासीच्या सुमारे ३०० बोलीभाषा आहे. वेगवेगळया बोलीभाषेमुळे आदिवासी जमातीचा वेगळेपणा दिसुन येतो कवर जमातीचे स्वतंत्र अशी लिपी नसुन ते देवनागरी लिपीचा वापर करतात. घरगुती व्यवहार व देवाणघेवाण छत्तीसगडी बोलीभाषेतुनच करतात. या जमातीची लोकगीते लोककथा परंपरा जरी स्वतंत्र असल्यातरी त्यांचे साहित्य अजुनही मौखिक स्वरूपात आहे. परंपरेने एका पीढी कडुन दुस–या पीढीकडे हस्तांतरीत होत असतात. आजच्या काळात अनेक बोली भाषा काळानरून नष्ट होत चालल्या आहे. परंतु आदिवासी कवर जमातीचे लोकगीते, लोककथा आपल्या बोलीभाषेतुनच व्यक्त करतांना दिसतात. त्यांच्या भाषेमध्ये एक वेगळेपणा जाणवतो कवर जमातीचे दैनंदिन व्यवहारातील काही शब्द खालील प्रमाणे आहे.

| मराठी शब्द | छत्तीसगडी शब्द |
|---|---|
| मी ––– | मेंहा |
| इकडे ––– | येडाहन |
| तिकडे ––– | वोडाहन |
| मी जातो ––– | मेहा जाथो |
| तो गेला ––– | ओ चलदीस |

तो शाळेत जातो ——— ओहा पढेला जाथे

कुठ चालेले ——— कहा जाथस

तुझ्या आईचे नाव ——— तोर दाई के नाव का हावे

तुझ्या बापाचे नाव ——— तोर बवा के नाव का हावे

दररोज शाळेत जा ——— रोजके स्कुल जातजा

मला तहान लागली——— मोला अब्बळ पियास लगीस

मुलगी ——— टुरी

मुलगा ——— टुरा

अशा पध्दतीने कवर जमातीचे भाषेचे एक वेगळेपण आहे. त्यात एक भाषेतील वेगळी लालीत्य व मार्दवपणा दिसुन येतो. छत्तीसगडी भाषा ही हिंदी भाषेशी मिळती जुळती भाषा आहे. बहुतेक लाग हिंदी अथवा छत्तीसगडी भाषेचा वापर दैनंदिन व्यवहारात करतांना दिसतो. देवरी वरून १० ते १२ किमी अंतराने छत्तीसगड सिमाप्रांत सुरू होतो. तेव्हा आपल्याला लक्षात येते की, तथील १०० टक्के लोकसमुदाय छत्तीसगडी भाषेचा वापर करतांना दिसतात मराठी भाषेशी त्यांचा फार कमी संबंध व व्यवहार दिसत नाही. अंत्यंत आपुलकीने जिव्हाळयाने ऐकमेकांशी संवाद साधतांना दिसतात. हे या बोलीभाषेचे एक वेगळेपणा आपणास जाणवतो त्यात व्यवहारातील उपकरणाची नावे असतील, नातेसबंधातील नाव पशु—पक्ष्यांची नावे, प्राण्याचीनाव, रंगाच्या बाबतीतही असतील तरीही त्यांच्यातील वेगळेपणा बोलीभाषेत असतो.

**मौखिक लोकगीते :—**

कवर जमातीत अनेक उत्सव अतिशय जल्लोषात साजरा करतात. जसे अक्ती, हरेली, नागपंचमी, पोळा, पित्तरपाग , जेठोणी पुन्नी, दिवाळी इत्यादी सण मोठया हर्षोल्हासाने साजरा करतात. त्यापैकी पौष पौर्णिमेला छेरछेरा उत्सव मोठया उत्साहाने गावातील स्त्री—पुरूष एक गट निर्माण करूण गावोगावी धान्य,पैसा गोळा करीत आपल्या पारंपारिक लोकनृत्य करून लोकगीते गात नृत्य करून प्रत्येक गावात भ्रंमती करतात काही समुह हातात डंडे घेवुन एका विशिष्ट गाण्यांच्या तालावार तबला, पेटी वाजवुन नृत्य करतांना दिसतात. त्यालाच छत्तीसगडी मध्ये डंडा नाच असेही संबोधले जाते. हेही एक मौखिक लोकसाहित्याचे उत्तम नमुना समजले जातात.

**विवाहगीते :—**

विवाह प्रसंग म्हणजे कवर जमातीतील एक पर्वणीकाळ समजला जातो एक आठवडयाच्या आधीच लग्नाच्या तयारीला प्रत्येक कुटूंबातुन एक व्यक्ती विवाह कार्य पुर्णत्वास नेण्यासाठी एकजुटीने काम करतांना दिसतात. पुरूष असोवा स्त्रि प्रत्येक लोक आपल्या परीने ज्याच्याघरी लग्न समारंभ असेल त्यांच्या प्रत्येक कामाला मदत करण्यास उत्सुक असतात. त्यामध्ये मंडप पुजनाच्या दिवशी मंडप सजविण्यासाठी चारच्या झाडाच्या मुंडा गाडतात व त्यावर सुंदर कलाकृती हाताने काढुन व रंग लावुन मांडपाच्या मध्यभागी ठेवतात चारच्या झाडाच्या मुंडा गाडतात व त्यावर सुंदरगावाच्या बाहेरून शुध्द माती खोदुन आणुन त्यांची रितसर पुजा करतात. त्यामध्ये गावातील अविवाहीत मुले, मुली घरचे मंडळी असतात. माती खोदतांना स्त्रिया लोकगीत म्हणतात व अविवाहित तरूण वर्गांना चिडविण्याचा प्रयत्न करतात. त्या लोकगीतातुन व्यक्त होतांना दिसतात जसे.

तोला साबर धरेला, तोला साबर धरेला।।२।।

नही आवय जी धीरे—धीरे।

धीरे—धीरे अपन पागाला तीर धीरे—धीरे

तोला माटी कोळेला नही आवयजी धीरे—धीरे

धीरे—धीरे अपन धोतीला तीर धीरे—धीरे

तोला माटी जोरेला, तोला माटी जोरेला

नही आवय जी धीरे—धीरे।

अपन कुरथाला तीर धीरे—धीरे

गावातील सुहासिनी पुरूषांना चिडविण्याचा प्रयत्न त्यांच्या वेशभुषेला उद्देशुन लोकगीत म्हणतात या लोकगीतात सुहासिनी जे अविवाहीत असतात त्या पुरूषांना उद्देशुन म्हणतात की माती खोदतांना जे शेतकी अवजार सहबल चा वापर करतात, ते साहित्य तुम्हाला बरोबर वापर करता येत नाही त्यासाठी तुम्ही आधी स्वत:चे फेटा/पगडी बरोबर सांभाळा, आनी हळू—हळू माती बाहेर काढा त्यासाठी तुम्ही आपले शर्ट व्यवस्थीत करा, तुम्हाला माती खोदता येत नाही, धड उचलताही येत नाही अशा उपहासात्मक लोकगीत सादर करून पुरूषांना चिडविण्याचा प्रयत्न करीत असतात. आणि अत्यंत भावपूर्ण एकमेंकांशी आदानप्रदान करतांना दिसतो.

**हळदीच्या कार्यक्रमाप्रसंगातील लोकगीते :—**

मंडप पुजनाच्या दिवशी वर—वधु असलेल्या खोलीत आपआपल्या कुल देवतांना साक्षी ठेवुन विधिवत कच्च्या हळदीने पुजा करतात. याच बरोबर कुलदेवतेला प्रथम सात फेरे लावल्यानंतर आपल्या कडेवर घेवुन आनंदाने लोकगीते गाऊन दोहा बोलूननृत्य करतात. यासाठी घरातील मुख्य कर्ता पुरूष पारंपारिक वाद्याचे आयोजन केलेले असतात. व स्वता:मध्ये बेधुंद होत नृत्याचा अविष्कार करीत असतात अशा शुभप्रसंगी सुहासिनी दोहा किंवा लोकगीत सादर करून आपल्या संस्कृतीचं अविष्कार करतांना दिसतात यातीलच एक लोकगीत

१) एक दल रेंगे हाथी और घोडा

एक दल रेंगे उंट ।।२।।

मडवा में नाचे गणेश कुमारी, चमके चारो खुंट ।।२।।

२) चांदी—चांदी के खंबा गडे हे।

सोना के लगे किवाड, सोना के लगे किवाड ।।२।।

हिरा मोती के झुला गड़े हे।

झुले यशोदा के लाल ।।

३) नदियॉं तीर के पटवा भाजी,

पटपट करथे रे आये है बरतीयॉं टुरी

मटमट, मटमट करथेरे ।।

अशा पध्दतीने गावतीलच सुवासिनी आपल्या लोकगीतांनी वर—वधुना मंडपाभोवती फेर धरून नृत्य करतांना दिसतात वरील लोकगीतांचे भावार्थ म्हणजे पूर्वीच्या काळात रजा महाराज ज्यापध्दतीने राजवाडयात, महलात आपले ऐषोआरामात जीवन व्यतीत करायचे, आर्थिक समृध्दता, अन्न धान्याची कोणतेही कमतरता नाही अशा वैभव संपन्नता, श्रीमंतीचे जीवन म्हणजेच आपल्यासारखे सर्वसामान्य सुध्दा आहे, जरी गरीब कुटूंब असले तरीही ते अतिशय समाधानी होऊन लग्न समारंभ पार पाडीत असतात. आपल्या लोकगीतातुन एक वैभवसपन्नतेचे दर्शन व प्रत्यय घडविण्याचे कार्य आदिवासी कवर समाजातील मौखिक लोकसाहित्यातुन प्रत्ययास येते. वधुपक्षाकडील सुवासिनी मुली आपल्या लोकगीतातुन समोरच्या अविवाहीत पुरूषांना चिडविण्याच्या तसेच त्यांच्यात एक प्रेमिक भाव निर्माण व्हावं या उद्देशाने लोकगीते सादर करतात. मुलं किंवा मुली लग्न समारंभात सुंदर वेशभुषा व श्रृंगार करून असलेल्यांना एक निसर्गातील सुंदर प्रतिमा वापरून एक विडंबनात्मक लोकगीताचा अविष्कृत करत अतिशय मौज मस्तीने आनंद व्यतीत करतांना दिसुन येतो हेच हया लोकगीतातील मुख्य वेशिष्टये दिसुन येते.

**संदर्भ :**

कपूर डेहरिया मेघराज डॉ २४ एप्रिल २०१२ (प्र. आ.) — कवर आदिवासींचे सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन

आत्राम व्यंकटेश १५ जानेवारी १९८९(प्र. आ.) —गोंडी संस्कृतीचे संदर्भ प्रकाशक श्रीकृष्ण उमाळ

बाबर सरोजीनी : — आदिवासींचे सण आणि उत्सव लोकसाहित्य समिती प्रकाशन पुणे

गारे गोविंद (डॉ.) संपादक १९८८ — महाराष्ट्रातील आदिवासी संस्कृती समस्या व विकास महाराष्ट्र शासन.